**Date: Sat, 1 Oct, 2022, 6:40 pm**

**विषय : सोसायटी च्या पुनर्निर्माणकार्याबद्दल आलेल्या Expression of Interest च्या निविदा उघडणे.**

**दिनांक : O1 ऑक्टोबर, 2022.**

ठरविल्या प्रमाणे आज सकाळी 11 वाजता आपल्या सोसायटीच्या मधुकर जोशी सभागृहात, सोसायटी च्या पुनरनिर्माणा साठी आलेल्या निविदा उघडण्यात आल्या.

आपल्या सल्लागारांकडून एकूण 25 बिल्डर्स ने EOI documents घेतले होते त्यातल्या 19 बिल्डर्स ने निविदा भरल्या ज्या आज उघडण्यात आल्या.

ह्या वेळेस खालील प्रमाणे उपस्थिती होती --

1. बिल्डर्स चे प्रतिनिधी -- 20.

2. सोसायटी सभासद / कुटुंबीय - 18

3. सल्लागार - 2

4. पंच समिती सदस्य - 10

सर्व प्रथम पंच समिती चे अध्यक्ष श्री विजय सावंत यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्या नंतर सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी बिडस उघडण्याची प्रोसीजर कशी असेल ते सांगितले. आपले पुनर्निर्माण सल्लागार श्री हर्षल कवडिकर यांनी आलेल्या निविदा कोण कोणत्या बिल्डर्स कडून आल्या आहेत ती यादी उपस्थितांना सांगितली.

ह्या कामात पूर्ण पारदर्षिता असावी त्याकरिता एका नंतर एक बिल्डरच्या बंद निविदा सर्वांसमक्ष उघडण्यात आल्या. ह्या निविदांच्या फिनान्सियल भागावर त्या बिल्डरच्या प्रतिनिधीच्या, एक उपस्थित सोसायटी सभासदाच्या किंव्हा त्याच्या कुटुंबीयांच्या आणि एक पंच समिती सदस्याच्या नावा सकट सह्या घेण्यात आल्या. अश्या आलेल्या एकूण 19 निविदांच्या महत्वपूर्ण अश्या सह्या झालेल्या financial भागाच्या झेरॉक्स कॉपीज ही पंच समिती कडे असणार आहेत. ह्या सुमारास कुठली ही निविदा अगर त्याचा भाग कोणाला ही अभ्यासासाठी दाखवण्यात आला नाही.

ह्याच्या पुढे आलेल्या सर्व निविदांचे तुलनात्मक अभ्यास करून त्याचा एक चार्ट बनवण्यात येईल आणि तो सर्व सभासदां समोर ठेवण्यात येईल. त्यानंतर GB ठरवेल कि ह्यातले कुठले आणि किती बिल्डर शेवटच्या निविदां साठी पात्र ठरवायचे.

शेवटी अध्यक्षांनी कोणाला ही काही प्रश्न असल्यास ते विचारण्याचे आव्हान केले आणि कोणाचीही काही शंका नसल्याने उपस्थितांना धन्यवाद देऊन कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**प्रदीप नेवाळकर**

**पंच समिती तर्फे**